# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्री भगवानराव आसाराम काळे

मु.पो.कारला, ता. जि.जालना

- सेंद्रिय शेतीचे पुरस्कर्ते.
- परिसरातील शेतक-यांना लिंबोळी पेंड /अर्क, गांडुळ खत / बिजोत्पादन, भाजीपाला पिके, कृषि उत्पादन प्रतवारी इ. बाबत मार्गदर्शन.
- अद्यावत कोरडवाहू शेती तंत्रज्ञानासाठी समतल पेरणी, आच्छादनाचा वापर, मूलस्थानी जलसंधारण इ.अवलंब.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्री. गणेश लक्ष्मणराव मात्रे

मु.पो.दुर्गामाता चौक, दिग्रस,  ता. दिग्रस, जि.यवतमाळ

- संपूर्ण शेती सेंद्रिय व नैसर्गिक पध्दतीने करतात.
- आवळा मुरब्बा, सुपारी, ज्युस, लोणचे इ.मुल्यवर्धित उत्पादने घेऊन स्वतः विक्री करून आर्थिक लाभ मिळवतात.
- मूलस्थानी जलसंधारणासाठी विविध पध्दतीचा अवलंब.
- शेतकरी मेळावे, प्रदर्शनी, प्रशिक्षण, माहिती पत्रिका, लेख इ.माध्यमातून शेतक-यांना मार्गदर्शन.
- आवळा प्रक्रियेबाबत रोजगाराभिमुख प्रशिक्षण.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्री खंडेराव दौलत शेवाळे

मु.पो.भुयाणे, ता. सटाणा, जि.नाशिक

- भाजीपाला, टोमॅटो या नगदी पिकाबरोबर द्राक्षबागेची उभारणी.
- जिथे राबती हात तिथे श्रीहरी या उक्तीप्रमाणे काळया मातीची सेवा करून परकीय बाजारपेठेत द्राक्ष निर्यात.
- शेतकरी गट / समुह निर्माण करून द्राक्ष, डाळिंब इ.चे अद्यावत तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन.
- राष्ट्रीय बागवानी बोर्डाच्या सहकार्याने सहकारी तत्वावर ग्रेप ग्रोअर्स संस्थेची स्थापना.
- कोल्ड स्टोअरेज व प्रिकुलींग युनिटची सटाणा तालुक्यात प्रथमतः उभारणी.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्रीमती कुसुमताई बापूराव करपे

मु. करपेवाडी, पो. मानेवाडी, ता. पाटण, जि. सातारा

- महिला बचत गटांद्वारे महिलांचे स्वावलंबन.
- विम्याचे महत्व विषद करून तालुक्यातील पहिले विमाग्राम होण्याचा मान.
- जलसंधारण, ग्रामस्वच्छता अभियान, सेंद्रिय शेती इ.बाबत जागृती निर्माण केली.
- वनराई बंधा-याचा पुरस्कार करून पिकांना संरक्षित पाणी उपलब्ध करून देण्यात पुढाकार.
- महिलांचे आरोग्य व अंधश्रध्दा निर्मुलनाचे कार्य.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्री मधुकर आप्पाजी खर्चे

मु.पो.कळस (गोसावीवाडी) ता. इंदापूर, जि. पुणे

- सेंद्रिय शेतीचा अवलंब.
- द्राक्ष बागेत हंगामध्ये बहार धरण्यापुर्वी माती परिक्षणानुसार खताच्या मात्रांचा वापर.
- ठिबक सिंचन केल्यावर एकाच ड्रिपरने झाडाला पाणी देऊन तणविरहित शेतीचे नवीन तंत्र विकसीत.
- मळणी मशीनमध्ये बदल करून बेदाणे तयार करण्याचे नवीन तंत्र विकसीत.
- द्राक्ष, डाळिंब पिकाबाबत शेतक-यांच्या शेतावर तसेच दूरदर्शन वाहिन्यांवरून मार्गदर्शन.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्री. प्राणहंस नानाजी मेहर

मु. कुशारी, पो. मोहगांव (देवी) ता. मोहाडी, जि. भंडारा

- पाण्याच्या संतुलित व कार्यक्षम वापरासाठी तुषार सिंचनाचा वापर.
- महिला / पुरूष बचत गट, कृषि विकास संघ, दुध डेअरी स्थापन करून मार्गदर्शन.
- दुग्ध व्यवसाय, शेळी, मेंढी पालन, गांडुळ खत, निळे हिरवे शेवाळ इ.उत्पादने घेऊन त्याबाबत शेतकरी समुहास मार्गदर्शन.
- उच्च व अद्यावत तंत्रज्ञानाचा शेतामध्ये सातत्याने वापर करून परिसरातील शेतक-यांना मार्गदर्शन.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्री पंडीतराव गणपतराव शेळके

मु. मोघा, पो.तीर्थ, ता.अहमदपूर, जि. लातूर

- आंब्याची निर्यात हाँगकाँग, जपान तर द्राक्षाची निर्यात युरोपीय बाजारपेठेत.
- सेंद्रिय पध्दतीने गुळ उत्पादन.
- माती व पाणी परिक्षण करून एकात्मिक अन्नद्रव्य, पाणी व किड व्यवस्थापनाचा अवलंब.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्री रणजित आप्पासाहेब खानविलकर

मु.पेढांबे, ता.चिपळूण, जि. रत्नागिरी

- आंबा, काजू, सुपारी, नारळ आणि केळी या फळपिकांसमवेतच आंतरपिक म्हणून मसाला पिकांची लागवड.
- स्वगावी ५० एकरावर सामुदायिक कृषि प्रकल्प उभारणी.
- ५० एकर क्षेत्रावर टिश्युकल्चर केळीची लागवड.
- सामुदायिक शेती संकल्पनेचे पुरस्कर्ते.
- पाणी व्यवस्थापनासाठी ठिबक सिंचनाचा वापर.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्री शंकर विठोबा माळी

मु.पो.वाळवा, ता.वाळवा, जि.सांगली

- तन, मन, धनाने कृषि विकास, आधुनिकीकरण, माहिती तंत्रज्ञान आणि समृध्दीचा ध्यास असणारे शेतीतील भिष्माचार्य.
- दिवसा पिकवा मळा, रात्री शिका शाळा याद्वारे प्रौढ शिक्षण घेऊन साक्षर.
- द्राक्ष शेतीबरोबरच आंबा, पेरू, चिकु, सिताफळ इ.विविध फळपिकांची लागवड.
- उत्पादन खर्च कमी करण्यासाठी आंतरपिके, गांडुळखत, सेंद्रिय व जैविक खते / किटकनाशकांचा वापर.
- हवामान अंदाजाकरिता स्वतःच्या वेधशाळेची उभारणी.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २००७



## श्री सोपानराव बाबूराव अवचार

६६ अ, विकासनगर, कारेगाव रोड, परभणी

- सेंद्रिय खत, गांडुळ खत ,हिरवळीचे खत तसेच बायोडायनामिक खताचे उत्पादक व पुरस्कर्ते.
- १५०० सेंद्रिय शेती गटाचे संस्थापक, सेंद्रिय शेती डायरीच्या माध्यमातुन शेतक-यांना मार्गदर्शन.
- कृषि अर्थमंथन मासिकाचे संस्थापक.
- सप्तधान्य अंकुरापासून, अंडे व लिंबू रसापासून संजिवकांची निर्मीती.